शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर सुवर्ण महोत्सवी वर्ष-२०१२

SHIVAJI UNIVERSITY HISTORY CONFERENCE SELECT RESEARCH PAPERS

## शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद

# निवडक शोधनिबंध संग्रह



शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद प्रकाशन

फेब्रुवारी-२०१२

शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद, (रजि.) कोल्हापूर

(संस्था नोंदणी क्र.महाराष्ट्र/१०५७६-१९९५ आणि
सार्व. विश्वस्त संस्था नोंदणी क्र. एफ.१०४६७-१९९५)

# निवडक शोधनिबंध संग्रह

(१६ वे वार्षिक आधिवेशन फेब्रुवारी,२०११)

## संपादक मंडळ

प्राचार्य डॉ. विजयराव नलावडे
मुख्य संपादक

प्रा. डॉ. एस. पी. शिंदे
कार्यकारी संपादक

प्राचार्य डॉ. ए.एल. बेलवटकर

प्रा. डॉ. नंदा पारेकर

प्रा. डॉ. सुशिला ओडेयार

प्रा. डॉ. खंडेराव शिंदे

शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद प्रकाशन २०१२

सर्व हक्क प्रकाशकाधीन

प्रथमावत्ती :
फेब्रुवारी २०१२

प्रकाशक :
प्राचार्य डॉ. विजयराव नानासाहेब नलावडे
अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ, इतिहास परिषद
द्वारा इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मुद्रक व अक्षर रचना :
सिद्धिविनायक एंटरप्राईजेस,
३२२ यादोगोपाळ पेठ सातारा
मोबाईल:- ९४२०७७१३२६

ISBN 978-81-909284-2-7

किंमत रु. ३००/-

* या शोधनिबंध संग्रहात व्यक्त झालेल्या मतांशी वा निष्कर्षांशी संपादक मंडळ वा इतिहास परिषद सहमत असेलच असे नाही.

१२) प्रा.डॉ. सौ. कल्पना राजीव मोहिते ................... ९४
अंबादेवी मंदिर प्रवेश (अमरावती) एक अभूतपूर्व सत्याग्रह (१९२७)

१३) सुमित संभाजी यादव ................... १०२
महात्मा गांधी आणि साताराचे प्रतिसरकार

१४) प्रा. डॉ. सौ. सुशीला ओडेयार ................... १०९
मुळशी सत्याग्रहामधील महिलांचे योगदान

१५) डॉ. एस. पी. शिंदे ................... ११५
ग. प्र. प्रधान : जीवन व कार्य (१९४२ ते २०१०)

१६) श्रीमती अर्चना श्रीराम जाधव ................... १२०
मिस क्लार्क होस्टेलची स्थापना

१७) डॉ. अवनीश पाटील ................... १२९
जमखंडीकर अप्पासाहेब पटवर्धन आणि १८५७ चा उठाव : ब्रिटिश दस्ताऐवजांवर एक टीकात्मक टिपणी

१८) प्रा. अजितकुमार दादासो जाधव ................... १३५
१८५७ च्या उठावातील रंगो बापूजींचे योगदान

१९) प्रा. सुरेश वसंत शिखरे ................... १४२
धोंडजी वाघ

२०) प्रा.सुप्रिया चंद्रशेखर खोले ................... १५३
हुपरी–चांदी व्यवसाय–स्त्रियांचे योगदान

२१) डॉ. चंद्रवदन मो. नाईक ................... १६०
सेनापती घोरपडे कापशीकर व छत्रपती करवीर संबंध (१७०७ ते १८१८)

२२) प्रा. मनिषा जी. कुरणे ................... १६८
भाई दाजीबा देसाई : शे. का. पक्षातील झुंजार व्यक्तिमत्व

२३) प्रा. डॉ. एस्. एम्. गावडे ................... १७४
फलटण संस्थानातील सहकारी चळवळीचा उदय व विकास

# महात्मा गांधी आणि सातारा प्रतिसरकार

**श्री. सुमित संभाजी यादव**
संशोधक विद्यार्थी इतिहास विभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

**प्रस्तावना :**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास अतिशय रोमहर्षक व आगळा वेगळा अ आहे. स्वातंत्र्य लढ्यात सशस्त्र–निशस्त्र, मवाळ–जहाल, क्रांतिकारी यासारखे अने प्रवाह आहेत.लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, सर वल्लभभाई पटेल, लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल, स्वातंत्र्यवीर सावरकर, सुभाष बोस यांसारख्या शेकडो नेत्यांनी या स्वातंत्र्य लढ्यात महत्त्वपूर्ण योगदान दिलेले अ कोणतीही चळवळ यशस्वी होण्यासाठी लढाऊ, क्रांतिकारी, नि:स्पृह आणि दूरगा दृष्टी लाभललेले ध्येयवादी नेतृत्व लाभणे आवश्यक असते.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली १९२० नंतर असहका सविनय कायदेभंग, सत्याग्रह इत्यादीच्या आधारे जवळजवळ २२ वर्षे ब्रिटिशांच विरुद्ध सतत लढा दिला. महात्मा गांधींच्या नेतृत्वामुळेच ही स्वातंत्र्य चळवळ खर अर्थाने खेड्यापर्यंत पोहोचली. ग्रामीण भागातील जनताही या स्वातंत्र्य चळवळी भाग घेऊ लागली. तरीसुद्धा ब्रिटिश सरकार मात्र भारतीयांना स्वातंत्र्य देण्यास तया नव्हते म्हणून महात्मा गांधींनी ब्रिटिशांविरुद्ध १९४२ मध्ये 'चले जाव' हे आंदोल सुरू केले.

**सातारा प्रतिसरकारची स्थापना :**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या पर्वात १९४२ च्या चळवळीचे वैशिष्ट्यपूर्ण अ स्थान आहे. महात्मा गांधींनी ८ ऑगस्ट १९४२ मध्ये मुंबईतील गोवालिया टँक मैदानाव 'अंग्रेजो भारत छोडो' ही घोषणा व 'करेंगे या मरेंगे' हा मंत्र भारतीय जनतेला दिला. चळवळीच्या सुरुवातीलाच देशातील प्रमुख नेत्यांना इंग्रज राज्यकर्त्यांनी पकडून स्थानबद्ध केल्यावरही अनेक कार्यकर्ते भूमिगत झाले. भूमिगत राहून त्यांनी ही चळवळ



जोमाने सुरू ठेवली. महारा रा जिल्ह्याचा या लढ्यातील सहभाग हा उल्लेखनीय आहे. ब्रिटिश ऑगस्ट १९४२ चा कराड कचेरीवरील मोर्चा यशस्वी झाला. पाठो गावचे मोर्चेही यशस्वी झाले. परंतु त्यापाठोपाठ वडूज आणि इस्लामपूर येथ निघालेल्या शांततापूर्ण मोर्चावर पोलिसांनी गोळीबार केला. त्यामध्ये ११ आंदोलक हुतात्मे झाले.[१] शांततापूर्वक चाललेले आंदोलन दडपल्याने सातारा जिल्ह्यातील भूमिगत नेत्यांनी लढा चालविण्यासाठी पाच प्रमुख गट पाडले. ते पुढीलप्रमाणे : १) कुंडल गट, २) शिराळा आणि वाळवा (पश्चिम घाट) गट, ३) कराड गट, ४) उत्तरेचा गट, ५) सांगली गट[२] भारतात ४२ च्या चळवळीचा ओघ ओसरत असताना भूमिगतांनी प्रथम विभागवार विचार करून नंतर व्यापक बैठक घेतली. तसेच क्रांतिसिंह नाना पाटील, नागनाथ नायकवडी, लक्ष्मणराव कासेगावकर वैद्य,[३] किसनवीर, माधवराव जाधव, जी. डी. लाड, पांडू मास्तर, बाबूराव पाटणकर, निवृत्ती काका, डॉ. उत्तमराव पाटील, डी. जी. देशपांडे, इत्यादींनी सातारा प्रतिसरकारची स्थापना केली.

**सातारा प्रतिसरकारचे कार्य :**

साताऱ्यात नाना पाटलांच्या नावाने प्रतिसरकारची घोषणा करण्यात आली. तसेच किसनवीर यांची प्रमुख संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली. कार्यकर्ते स्वत:च सरकार झाले. शस्त्रास्त्रे, काठ्या, बंदुका, खजिना गोळा करण्यात आला. प्रतिसरकाला व्यापक मदत मिळावी म्हणून सरकार व जमीनदारांविरुद्ध मोहीम हाती घेऊन शेतकऱ्यांना दिलासा देण्यात आला. नाना पाटील यांनी 'तुफानी सेना' उभारून गुंडांच्या तळपायावर लाठ्या मारायला सुरुवात केली. यामुळेच प्रतिसरकारला पत्री सरकार असेही म्हणण्यात येऊ लागले. दि. ६ नोव्हेंबर १९४२ च्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट, सातारा यांच्या साप्ताहिक अहवालामध्ये नाना पाटील यांचा 'कुप्रसिद्ध काँग्रेसवाले' म्हणून उल्लेख करण्यात आला आहे.[४] साताऱ्च्या ग्रामीण भागातील क्रांतिकारकांचे शौर्य, संघटन कौशल्य व त्यागामुळेच प्रतिसरकार निर्माण होऊन दीर्घकाळ कार्यरतही राहिले.

ब्रिटिश सरकारने १९४२ च्या लढ्याबद्दल गांधीजी व काँग्रेस कार्यकारिणी यांना जबाबदार धरून ते शत्रूराष्ट्राच्या बाजूचे आहेत असा प्रचार चालवला. तसेच आंदोलन दडपण्यासाठी बळाचा वापर करण्यास सुरुवात केली. सरकारच्या या अन्यायी धोरणाचा निषेध करण्यासाठी गांधीजींनी १९ फेब्रुवारी १९४३ रोजी २१ दिवसांच्या उपोषणास

सुरुवात केली.[६] सातारच्या लोकांची गांधीजींवर अपार श्रद्धा होती. या
सातान्यातील भूमिगत कार्यकर्ते चिंताग्रस्त झाले. आंदोलनाचा वेग
गांधीजींनी उपोषण सोडल्यावरदेखील ही अनिश्चितता टिकून होती.
१९४३ याकाळात नाव घेण्यासारखे असे काही साताऱ्यात घडले नाही.
च्या पहिल्या आठवड्यात विद्यमान परिस्थितीवर विचार करण्यासाठी प्रतिसरकार
बैठक होऊन प्रतिसरकारचे कार्य जोमाने सुरू करण्याचा निर्णय झाला.
पोस्टातील, पोलीस ठाण्यातील, खाजगी तसेच फौजेतील शिपायांच्या
ठिकाणांहून क्रांतिकारकांनी हत्यारे मिळवली, काडतुसे, गोळ्या मिळवल्या
आपली ताकद निर्माण केली. दळणवळण बंद पाडून, तारेचे खांब पाडून, त्यांनी
अस्तित्व व संघटनचातुर्य दाखविले. डिग्रज, कऱ्हाड, रत्नागिरी इ. ठिकाणच्या
थैल्या पळविल्या, धुळ्याचा खजिना लुटला. शेणोलीच्या पुढे पे ट्रेनवर धाड घातली.
अन्यायी सावकारांवर दंड बसविला व पैसा जमा केला. प्रतिसरकारच्या माध्यमातून
साताऱ्यात ग्रामराज्याची स्थापना केली गेली. स्त्रियांसंदर्भात अन्याय केल्यास
दंड वा प्रसंगी प्राणदंडाचीही शिक्षा करण्यात येऊ लागली.[७] आता प्रतिसरकारचा
चांगलाच प्रचार व प्रसार होऊ लागला. अनेक भूमिगत या संघटनेत काम करीत होते.
शेकडो तरुण मुली शेतारानात हिंडून भूमिगतांना भाकरी पोचवीत होत्या. मातेच्या
मायेने आणि मनाने व सहप्रवासिनींच्या धीराने त्या भूमिगतांचा सांभाळ करीत होत्या.
प्रतिसरकारचा लढा हा जनतेचा लढा होता. त्यांना जनतेचे पाठबळ होते. तसेच साताऱ्यात
५ ते १० रुपयांत विनाखर्चिक स्वरुपात लग्नाची पद्धत नाना पाटील यांनी सुरू केली.
त्यालाच 'गांधी लग्न' असे म्हणत.[८]

### प्रतिसरकारविषयी विरोधी मतप्रवाह :

क्रांतिसिंह नाना पाटील यांनी प्रतिसरकारच्या माध्यमातून ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. एवढेच नव्हे तर सातारा जिल्ह्यापुरते ब्रिटिशांचे प्रशासन मोडकळीस आले होते. सातारचा हा लढा लोकलढा झालेला होता. संपूर्ण भारतात सातारा प्रतिसरकारविषयी कुतूहल होते. प्रतिसरकारची ही चळवळ जोमात सुरू असताना सातारची ही चळवळ काँग्रेसची चळवळ नाही असाही एक मतप्रवाह महाराष्ट्रातील भूमिगत नसलेल्या कार्यकर्त्यांत निर्माण झाला होता. देवकीनंदन नारायण, डॉ. दातार व आचार्य लिमये पुण्याहून सातारला आले व भूमिगत नेत्यांपैकी एक धन्वंतरी वैद्य यांना सातारची ही चळवळ गांधीजींच्या अहिंसेच्या तत्वात बसत नाही, तरी आपण ही



चळवळ थांबवावी असे म्हणाले. यावर धन्वंतरी वैद्य म्हणाले, "आमच्यापुढे तीनच पर्याय आहेत. १) आमच्या वर्किंग कमिटीने बाहेर येऊन लढा थांबवा असे म्हटले पाहिजे. २) अगर स्वातंत्र्य मिळणे ३) अगर स्वातंत्र्य लढा देत देत मरण पत्करणे, याशिवाय हा लढा थांबणार नाही."[९] नंतर आचार्य लिमये इत्यादींनी महाराष्ट्रात एक संघ निर्माण केला व सातारच्या प्रतिसरकारचे काम काँग्रेसच्या तत्वात बसत नाही असा प्रचार सुरू केला.

### सातारच्या प्रतिसरकारविषयी गांधीजींची भूमिका :

इ. स. १९२० ते १९४७ पर्यंत महात्मा गांधी यांनी सत्याग्रहाच्या सहाय्याने भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व केले होते. यालाच 'गांधी युग' असे म्हणतात. सत्य, अहिंसा व सत्याग्रह यावर गांधीजींची चळवळ उभी होती.[१०] निशस्त्र प्रतिकार हे गांधीजींच्या सत्याग्रहाचे प्रमुख शस्त्र होते. असहकार आंदोलन ऐन भरात असताना 'चौरीचौरा' येथील हिंसक घटनेमुळे व्यथित होऊन गांधीजींनी ते संपूर्ण आंदोलनच मागे घेतले होते.[११] हिंसक कारवायांना गांधीजींचा विरोध होता.

सातारा प्रतिसरकार हे प्रामुख्याने जशास तसे या न्यायाने कार्यरत होते. प्रसंगी हिंसेचाही त्यांनी विधीनिषेध बाळगला नाही. अशा वेळी ब्रिटिश सरकारने गांधीजींची आगाखान पॅलेसमधून ६ मे १९४४ रोजी सुटका केली. पुण्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी १० मे रोजी गांधीजींची भेट घेऊन महाराष्ट्रातील घातपाती चळवळीत जे काही घडले ते त्यांच्या कानावर घातले. गांधीजींना भेटलेल्या कार्यकर्त्यांत जी. ए. देशपांडे, एच्. जी. फाटक, टी. आर. देवगिरीकर, प्रेमा कंटक, इत्यादिंचा समावेश होता.[१२] पुढे म. गांधी सातारा जिल्ह्यातील पाचगणी येथे ९ जुलै १९४४ पासून मुक्कामास येणार आहेत असे समजल्यावर किसनवीर वगैरे लोक प्रतिसरकारची बाजू मांडण्यासाठी खिंडीत रस्त्यावर गेले होते. परंतु त्यांची भेट होऊ शकली नाही. गांधीजींनी नंतर इतर स्थानिक काँग्रेस कार्यकर्त्यांशी चर्चा करून एक सर्वसाधारण निवेदन वर्तमानपत्रात २८ जुलै १९४४ रोजी प्रसिद्ध केले. 'भूमिगत हालचाली या अहिंसेच्या विधायक तत्वाला मारक आहेत. भूमिगत कार्यकर्त्यांनी पोलिसात हजर होण्याचा आणि आपल्या अटकेमुळे स्वातंत्र्य आदोलनास मदत होईल.या समजुतीने पकडले जाण्याचा धोका पत्करावा असा सल्ला त्या पत्रकात दिला."[१३] गांधीजींनी १ ऑगस्ट रोजी पाचगणी सोडली व ते पुण्यात मुक्कामास गेले.

गांधीजींच्या निवेदनाला अनुसरून स्थानिक कार्यकर्ते भूमिगत नेत्यांवर पोलिसांत हजर व्हा म्हणून दडपण आणत होते. पुढे डी. के. गोसावी गांधीजींना भेटले. त्यांनी जिल्ह्यातील राजकीय परिस्थितीविषयी गांधीजींशी चर्चा केली. तेव्हा जिल्ह्यातील भूमिगतांनी आंदोलन थांबवावे अशा आशयाचा गांधीजींचा सल्ला असल्याचे भूमिगतांना कळविले. अच्युतराव पटवर्धनांनी याविषयी चर्चा करण्यासाठी महत्वाच्या भूमिगत नेत्यांची बैठक मुंबईत बोलावली. ही बैठक ऑक्टोबर १९४४ च्या दुसऱ्या आठवड्यात 'वेस्टर्न इंडिया लाईफ इन्शुरन्स कंपनी' च्या तळघरात पार पडली.[१४] तसेच गांधीजींना एक पत्र पाठवून पुढील बाबींविषयी लेखी स्पष्टीकरण मागितले. साताराची चळवळ काँग्रेस तत्वांशी मिळतीजुळती आहे का? साताऱ्याच्या भूमिगतांनी पोलिसांत हजर व्हावे का? त्यावर गांधीजींनी स्वतःच्या हातानी लिहून उत्तर पाठविले होते. ते असे - ''तुम्हारा हृदय मंजूर करे तो सवाल है इसमे। वर्किंग कमिटी जेल मे है। बाहर आ जाय तो निकाल देगी।''[१५] म्हणजेच तुमच्या अंतःकरणास पटत असेल व चुकीच्या मार्गाने गेलो असे वाटत असेल तर हजर व्हा. तुम्ही काँग्रेसमध्ये राहू शकता की नाही हा प्रश्नच निर्माण होऊ शकत नाही. कारण हे ठरविणारी काँग्रेस वर्किंग कमिटी जेलमध्ये आहे. ती बाहेर येऊन काय तो निर्णय घेईल. यानंतर स्वतःला गांधीवादी म्हणवून घेऊन भूमिगतांनी पोलिसांत हजर व्हावे असे म्हणणारे ते मंडळही लयास गेले.

यानंतर भूमिगतांनी आपल्या सद्सद्विवेक बुद्धीला पटेल तो निर्णय घेतला. किसनवीर, पांडू मास्तर, निवृत्ती काका व इतर भूमिगतांनी असा निर्णय घेतला की, गांधीजींचे हे निवेदन त्यांच्या वैयक्तिक अधिकारात काढलेले आहे. काँग्रेस कार्यकारिणीने जर पोलिसांत हजर व्हा, असा आदेश दिला तरच आपण हजर व्हायचे. कुंडल गटाने मात्र हजर होण्यास पूर्णतः नकार दिला. तर बिळाशी गट पोलिसांत हजर झाला.[१६]

ब्रिटिश सरकारच्या दडपणाला मोठ्या धैर्याने तोंड देऊन प्रतिसरकारचे कार्य अव्याहतपणे चालू असल्याने चिडून जाऊन ब्रिटिशांनी २२ ऑगस्ट १९४५ रोजी सातारा जिल्हा काँग्रेस सरकार, जिल्हा काँग्रेस संस्था, प्रतिसरकार, राष्ट्र सेवा दल, गाव कोर्टे, गाव पंचायती, न्यायदान मंडळे, काँग्रेस कमिट्या इत्यादी सातांऱ्यातील संस्था बेकायदेशीर ठरविल्या.[१७]

२६ ऑगस्ट १९४५ रोजी अच्युतराव पटवर्धनांचे बंधू रावसाहेब पटवर्धन यांनी साताऱ्याच्या प्रकरणासंबंधी चर्चा करण्यासाठी गांधीजींची भेट मागितली पण गांधीजींनी भेटण्यास नकार दिला. 'साताऱ्याबद्दल पुरेसे ऐकले आहे व पाचगणीहून प्रस्तुत केलेल्या





निवेदनाशिवाय आपल्याला अधिक काही म्हणायचे नाही.' असे गांधीजी त्यांना म्हणाले होते.[१८]

प्रतिसरकार चळवळीबरोबरच गांधीजींचा संबंध अनुषंगिक होता. गांधीजी या चळवळीचे स्फूर्तिस्थान होते. साताऱ्याच्या प्रतिसरकारची चळवळ ही लोकांच्या पाठिंब्यावर चालणारी लोकचळवळ होती. पोलिसांच्या अत्याचाराचा व जुलुमाचा चळवळीवर अपेक्षित परिणाम न होता. उलट ती अधिक जोमाने चालविली जात होत. साम्राज्यवादी ब्रिटिश शासन व्यवस्थेचा मूळ पाया उखडून टाकण्यात साताऱ्याच्या प्रतिसरकार चळवळीचे योगदान अतुलनीय स्वरूपाचे आहे.

## मूल्यमापन :

गांधीजींच्या एका शब्दासाठी भूमिगतांनी आपल्या प्राणांची बाजी लावली होती. जर गांधीजींनी या प्रतिसरकारला विरोध दाखवून निषेध केला असता तर साताऱ्याची ही चळवळ खात्रीने थांबवून भूमिगत पोलिसांच्या स्वाधीन झाले असते. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी गांधीजी अहिंसेने लढत होते. स्वांतत्र्य हे त्यांचे उद्दीष्ट होते. प्रतिसरकार चळवळीचा गांधीजींनी निषेध करावा, विरोध करावा यासाठी काँग्रेसमधील कांही मंडळी प्रयत्न करीत होती. ब्रिटिश साम्राज्याला आव्हान देणाऱ्या तसेच असहकार चळवळीतील एका हिंसक घटनेमुळे ते संपूर्ण आंदोलन मागे घेणाऱ्या गांधीजींना प्रतिसरकार चळवळीचा असा विरोध, निषेध करणे शक्य असतानाही त्यांनी उघड आणि स्पष्टपणे निषेध केला नाही याचाच अर्थ म्हणजे राष्ट्रीय आशय असलेल्या साताऱ्याच्या प्रतिसरकारविषयी गांधीजींना सहानुभूती होती. चळवळीला त्यांची मूक संमती होती असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

## संदर्भ :

१) ताटके अरविंद, 'राष्ट्रपिता महात्मा गांधी' मिनल प्रकाशन, कोल्हापूर १५ ऑगस्ट १९९३, पृष्ठ ४

२) प्रा. पाटील विलास, क्रांतिसिंह नाना पाटील, पृष्ठ ९८

३) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सातारा जिल्हा, पृष्ठ २१०

४) मुंबई पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र राज्य, होम डिपार्टमेंट (स्पे.) फाईल नं. ८००-७४-१४-३-१९४१-४३, पृष्ठ १९७

५) डॉ. शिंदे आबासाहेब, सातारचे प्रतिसरकार : प्रसंग आणि व्यक्ती उषा प्रकाशन, कोल्हापूर, १० मार्च १९८७, पृष्ठ – ७

६) भागवत कमल, क्रांतिसिंह कॉम्रेड नाना पाटील, भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या महाराष्ट्र राज्य कौन्सिलचे प्रकाशन, प्रथमावृत्ती, २६ जानेवारी १९७७, पृष्ठ ..

७) मुंबई पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र राज्य, होम डिपार्टमेंट (स्पे.) फाईल नं. ५०१ (आय) अे १९४५–४६, पृष्ठ २३

८) अॅड. पाटील सुभाष, क्रांतिसिंह नाना पाटील : सामाजिक आणि राजकीय वाटचाल, क्रांतिवैभव प्रकाशन, हणमंत वडिये, पृष्ठ २६

९) कुलकर्णी ल. ग. उर्फ धन्वंतरी कासेगावकर वैद्य, सातारचे प्रतिसरकार : स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई ३२, प्रथमावृत्ती मे १९८८, पृष्ठ ४८

१०) गांधी मो. क., हिंदी अनुवाद, गौड वि. द., सत्य के प्रयोग अथवा आत्मकथा, साहनी पब्लिकेशन, दिल्ली २००९, पृष्ठ २८६

११) कुमार-राजीव (संपादक), ओझा एन्. एन्., संपूर्ण इतिहास आधुनिक भारत, भाग – २, क्रॉनिकल पब्लिकेशन, दिल्ली, पृष्ठ ९५

१२) कुलकर्णी ल. ग. उर्फ धन्वंतरी कासेगावकर वैद्य , उपरोक्त, पृष्ठ ४९

१३) डॉ. शिंदे आबासाहेब, उपरोक्त, पृष्ठ १०

१४) कित्ता, पृष्ठ ११

१५) कुलकर्णी ल. ग.उर्फ धन्वंतरी कासेगावकर वैद्य, उपरोक्त, पृष्ठ ५०

१६) डॉ. शिंदे आबासाहेब, उपरोक्त, पृष्ठ १४३

१७) कुलकर्णी ल. ग. उर्फ धन्वंतरी कासेगावकर वैद्य, उपरोक्त, पृष्ठ १०

१८) डॉ. शिंदे आबासाहेब, उपरोक्त, पृष्ठ १४७


❋❋❋



# मुळशी सत्याग्रहामधील महिलांचे योगदान

प्रा. डॉ. सौ. सुशीला ओडेयार कोल्हापूर

'स्वांतत्र्य लढा' हा भारतीय इतिहासातील सुवर्ण अक्षरांनी लिहिलेले पान आहे. या लढ्यामध्ये पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांनी सहभाग घेतला. 'छोडो भारत' आंदोलनामध्ये हजारो महिलांनी तुरूंगवास भोगला. महिलांच्या सक्रीय सहभागाची सुरूवात स्वांतत्र्य लढ्याच्या पहिल्या पर्वापासून–असहकार चळवळ झाली. प्रस्तुत शोध निबंधामध्ये पहिल्या असहकार लढ्यातील महिलांच्या कार्याचा आढावा घेतला आहे.

'भारतीय स्त्री चळवळ' हा भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा एक अविभाज्य भाग होता. स्त्री हक्कांची जाणिव आणि देशासमोरील प्रश्नांची जाणिव यामुळे महिला स्वातंत्र्य लढ्यामध्ये भाग घेण्याविषयी जागरूक झाल्या. ही जाणिव जागृती हळुहळु आणि मर्यादितपणे होत असली तरी १९२० पर्यंत स्वातंत्र्य लढ्यामध्ये महिलांना सामील करून घेण्याचे प्रयत्न झाले नाहीत.[१] १९२० मध्ये गांधीजीनी सर्वजाती धर्मांच्या पुरूषांबरोबर महिलांनीही स्वातंत्र्य चळवळीमध्ये सामील होण्याचे आवाहन केले. सहाजिकच स्वातंत्र्य लढ्याचे स्वरूप पुर्णतः बदलले. गांधीजींच्या या प्रयत्नाविषयी भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू म्हणतात, ''क्रांतीकारी गांधीजीनी आमच्या महिलांमध्ये मूलभूत परिवर्तन घडविले. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महिला मोठ्या प्रमाणावर घरातुन बाहेर पडल्या आणि लढ्यात सामील झाल्या. एकदा जुन्या श्रृंखला तोडल्यानंतर त्यात पुन्हा बांधण्याचे प्रयत्न झाले पण त्या श्रृंखला तुटणारच होत्या''[२]

वरील विधान १९३० च्या असहकार चळवळीतील महिला सहभागाविषयी असले तरी त्यातून गांधीजीनी समाजातील एका मोठ्या प्रवाहाला महिलांना स्वातंत्र्य चळवळीत कसे आणले हे स्पष्ट होते.

गांधीजीनी १९२० मध्ये एक वर्षात भारतामध्ये स्वराज्य आणण्याची घोषणा केली.